दैनिक
# लोक आरंभ
www.lokaarambh.com
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक ३६ | रविवार १८ जानेवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 | पान ४ | किंमत २ रू
Beed | year - ०4 th | Issue 36 | Sunday 18 January 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 | Page 4 | Price 2


# 'देवा'ची इच्छा असेल तर
## महापौरपदाबाबत उद्धव ठाकरेचं मोठं विधान



राज्यासह संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीत भाजपला 89 आणि शिवसेनेला 29 जागा मिळाल्या आहेत. तर ठाकरे बंधुंना 71 आणि काँग्रेसला 24 जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आता महायुतीचा महापौर होणार आहे. या निवडणुकीत उद्धव आणि राज ठाकरे यांनी युती केली होती. मात्र या युतीचा फारसा फायदा झालेला दिसत नाही. यानंतर आता उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत या निकालावर भाष्य केले आहे.

आपला महापौर व्हावा ही देवाची इच्छा असेल तर ते होईल.' मला मुंबईकरांकडून आणखी अपेक्षा नक्कीच होती

पुढे बोतलाना उद्धव ठाकरेंनी, 'मला मुंबईकरांकडून आणखी अपेक्षा नक्कीच होती. 25 वर्षे आम्ही जी काही सेवा केली, सुधारणा केल्या, त्या आम्ही सर्वांसमोर ठेवलेल्या होत्या. कोविड काळात जे काही काम केले त्या



मुंबई मॉडेलची जगभरात प्रशंसा झाली. हे सगळं पाहिल्यानंतर असं आम्हाला वाटलं होतं की मुंबईकर अधिक आशीर्वाद आम्हाला देतील. आता मोठ्या प्रमाणावर आशीर्वाद जरी दिले नसले तरी जे दिलेत ते भरपूर दिले आहेत असं विधान केले आहे.

भाजप जमिनीवरची शिवसेना संपवू शकत नाही – उद्धव ठाकरे

उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेत मतदारांचे आभार मानले. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने कागदावरती शिवसेना संपवली असेल, पण जमिनीवरची शिवसेना ते संपवू शकत नाहीत हे कालच्या मुंबई महापालिकेच्या आणि राज्यातील इतर निकालांनी दाखवून दिलं आहे. भारतीय जनता पक्ष हा कागदावरती आहे, पण जमिनीवरती नाहीये. तो जर जमिनीवर असता तर त्यांना पक्ष फोडावे लागले नसते. त्यांना पुसली जाणारी शाई वापरावी लागली नसती. यंत्रणेचा दुरुपयोग करावा लागला नसता. नियम बदलावे लागले नसते.'

### देवाच्या मनात असेल तर...

मुंबई महापालिकेच्या निकालावर बोलताना आणि मुंबईच्या महापौर पदाबाबत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, 'मुंबईमध्ये आमची महापौर होणार आणि व्हावा अशी आमची इच्छा होती आणि आजही आहे. तो आकडा आज तरी आम्ही गाठू शकलेलो नाही. मात्र जो निकाल लागला आहे त्या निकालाने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला आहे. आपला महापौर व्हावा ही देवाची इच्छा असेल तर ते होईल.'

# कोळेश्वर विद्यालयाचे चित्रकला परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी : गेवराई महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) मध्ये गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील कोळेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाने या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यापैकी प्रथम श्रेणीत कु.रितिका जोगदंड, हर्षदा बारहाते, कृष्णाली धोत्रे, प्रणाली नेमाने, पुनम आबूज, शितल मासाळ, शितल यादव, श्रावणी जोगदंड या ८ विद्यार्थीनी, द्वितीय श्रेणीत १२ विद्यार्थी तर



तृतीय श्रेणीत ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थी यशस्वी झाल्याने विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत तसेच विद्यालयाचे कला शिक्षक निकम सर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांनी वर्षभर सातत्याने केलेल्या सरावाचे हे यशस्वी फलित असल्याचे सांगण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच संस्थेचे सचिव एम.एम. नावंदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश बागलाने, विद्यालयाचे कला शिक्षक निकम सर आणि सर्व शिक्षकवृंद यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले आहे. कोळेश्वर विद्यालयाने कला शिक्षणाच्या क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे परिसरात तसेच पालक वर्गात समाधान व्यक्त होत असून विद्यार्थ्यांसाठी ही बाब प्रेरणादायी ठरत आहे.

# वातावरणात मोठा बदल, या राज्यात थेट इशारा,



राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होताना दिसत आहे. थंडी, पाऊस आणि उकाडा या तिन्ही गोष्टी सुरू आहेत. वर्षाच्या सुरूवातीच्या पहिल्याच दिवसी जोरदार पाऊस झाला. त्यापूर्वी डिसेंबर महिन्यात कडाक्याची थंडी होती. उत्तरेकडून थंडी वाढताना दिसत आहे. उत्तरेकडील राज्यात भारतीय हवामान विभागाने मोठा अंदाज दिला असून पुढील काही दिवसात तापमानात घट होईल. उत्तरेकडे जरी कडाक्याची थंडी असली तरीही राज्यात तापमानात चढउतार बघायला मिळत आहे. दुपारनंतर ढगाळ वातावरण आहे. राज्यातील बऱ्यापैकी थंडी गायब झाली. थंडी जरी गायब झाली असली तरीही वायू प्रदूषण काही कमी होत नाही. मुंबई, पुणे आणि दिल्लीत प्रचंड वायू प्रदूषण वाढलंय. मुंबईमध्ये सायंकाळच्या वेळी आकाशात अंधूक दिसते. वाढत्या वायू प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

पुणे शहर परिसरात उन्हाचा पारा वाढल्याचे सध्या चित्र आहे. गेल्या काही दिवसांपासून किमान आणि कमाल तापमानात वाढ झाली असून थंडीचा जोर ओसरला आहे शहर आणि परिसरात रात्री आणि पहाटेच्या वेळी हवेत गारवा जाणवत असला तरी दुपारनंतर मात्र उन्हाचा पारा अधिक तीव्र होत आहे.

# भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री राज के. पुरोहित यांचे निधन



भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी कॅबिनेट मंत्री आणि मुंबई भाजपचे माजी अध्यक्ष राज के. पुरोहित यांचे काल रात्री मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे मुंबईतील भाजपचा एक आक्रमक आणि अभ्यासू चेहरा हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

सलग पाच वेळा आमदार

राज के. पुरोहित हे मुंबईच्या राजकारणातील एक मोठे नाव होते. त्यांचा मुंबईच्या राजकारणात मोठा दबदबा होता. दक्षिण मुंबईतील मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातून त्यांनी सलग पाच वेळा विधानसभा निवडणूक जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले होते. त्यांनी १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ अशा सलग निवडणुकांमध्ये विजय मिळवला होता. युती सरकारच्या काळात (१९९५-१९९९) त्यांनी कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी सांभाळली होती.

# शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी
## अमरदिप कदम तर स्वागताध्यक्षपदी शिवा पवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी अमरदीप पाटील कदम तर स्वागताध्यक्षपदी शिवा पाटील पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची बैठक १७- जानेवारी रोजी गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. यावेळी बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारिणी निवडण्यात आली. यात सर्वानुमते





शिवजयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी अमरदीप कदम स्वागताध्यक्षपदी शिवा पवार, कार्याध्यक्ष आकाश इंगोले आयोजक सुमित माने संयोजक रितेश मंत्री उपाध्यक्ष गणेश आमले,सचिव प्रकाश गोरे, कोषाध्यक्ष अक्षय पावडे उपाध्यक्ष गणेश सोमवंशी सहसचिव विशाल शिंदे तर कार्यकारणी सदस्य म्हणून महेश दिवसे ,किशन मुंगल ,राजू कानवटे ,सोपान शिंदे ,पांडुरंग बादड, सोमेश बेद्रे ,प्रणव भटकर यांची निवड करण्यात आली.

# महापालिकेत मिळालेल्या विजयाचा मारताळ्यात जल्लोष



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड-वाघाळा महानगरपालिकेत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत पहिल्यांदाच भाजपने सत्ता मिळवली. या ऐतिहासिक विजयाबद्दल भाजप कार्यकर्त्यांनी लोहा तालुक्यातील मारतळा येथे फटाक्यांची आतषबाजी करत विजयाच्या घोषणा देत व पेढे वाटून आनंद साजरा करत जल्लोष केला.

यावेळी लोहा उत्तर मंडळाचे अध्यक्ष उद्धव पाटील, भास्कर पाटील जोमेगावकर, सरपंच संतोष भरकडे, गोविंद चिंचोलीकर, विलास भरकडे, विलास पाटील, गोविंद भरकडे, भास्कर ढेपे, गोविंद ढेपे, तिरुपती ढेपे, शिराळे, श्यामराव वडवळे, नरसिंग भरकडे, संभाजी भरकडे, रमेश ढेपे, काळबा गजभारे यांच्यासह भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# हिंद-दी-चादर उपक्रमांतर्गत जि. प. उच्च प्राथमिक शाळा कोळी बोडखा येथे प्रभात फेरी उत्साहात

लोक आरंभ प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे

तालुका पैठण येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा येथे माननीय शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांच्या सूचनेनुसार "हिंद-दी-चादर" या उपक्रमांतर्गत दिनांक 17 जानेवारी 2026 रोजी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन मराठी व उर्दू माध्यमांचे मुख्याध्यापक श्री. तुकाराम ढोले व इब्राहिम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रभात फेरीमध्ये श्री गुरु तेग बहाद्दर यांचे बलिदान तसेच भाई सती दास, भाई मती दास व भाई दयाल यांच्या शहादतीचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या घोषणांतून प्रभावीपणे मांडण्यात आले.

"हिंद दी चादर, श्री गुरु तेग बहाद्दर",
"शिश कटे पर पीछे ना हटे, मानवता के खातीर मर मिटे",



"गुर की शहादत याद करो, मानवता की राह धरो"
अशा घोषवाक्यांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

प्रभात फेरी यशस्वी करण्यासाठी शिक्षक आंधळे, ढवळे, शिक्षिका गंगथडे, गहेरवार, जगताप, तनवीर, सुमेरा हे सर्व शिक्षकवृंद व शालेय व्यवस्थापन समिती यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी हातात फलक व फ्लायर्स घेऊन मानवता, धर्मनिष्ठा व बलिदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवला.

कार्यक्रमादरम्यान मोठ्या प्रमाणावर छायाचित्रण व व्हिडिओ शूटिंग करण्यात आले असून सदर साहित्य शासनाने दिलेल्या लिंकवर अपलोड करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल आदर, देशभक्ती व मानवतावादी मूल्यांची जाणीव निर्माण झाली.

सं पा द की य

# चांदीची उड्डाण

प्रशांत बाफना 8055440385

"चांदीची किंमत दिवसेंदिवस का वाढत आहे याची कारणमीमांसा

भारतात चांदी ही समृद्धीचे प्रतीक मानली जाते.गरिबांचे सोने म्हणून ती ओळखली जाते. एकेकाळी किलोच्या भावात मिळणारी चांदी, गेल्या वर्षभरात आता सोन्याच्या पावलावर पाऊल ठेवत महागाईच्या आकाशात गोते खात आहे.चांदीच्या दरांचा विचार केला तर गेल्या बारा महिन्यांतील चढउतार थक्क करणारे आहेत. जानेवारी २०२५ मध्ये चांदीचे दर प्रति किलो ८५९१३ रूपये इतके होते.डिसेंबर २०२५ पर्यंत चांदी २ लाख ४७ हजार रूपयांवर पोहोचली आणि आता जानेवारी २०२६ मध्ये ती २ लाख ६५ हजार रूपयांच्या दिशेने धावत आहे.गेल्या वर्षभरात चांदीने दिलेली १६० टक्क्यांची दरवाढ ही जागतिक अर्थव्यवस्थेसाठी एक मोठा धक्का मानली जात आहे.चांदीची दरवाढ एवढी प्रचंड आहे की,मध्यमवर्गीय कुटुंबांना आता लग्नसराईसाठी चांदीची भांडी किंवा दागिने खरेदी करणे अशक्य झाले आहे.सोन्याच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही.सोन्यानेही दीड लाख रूपये प्रति दहा ग्रॅमच्या दिशेने आपली वाटचाल वेगाने सुरू केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिकन डॉलरची घसरण आणि जागतिक बँकांनी सोन्याच्या साठवणुकीवर दिलेला भर यामुळे सोन्याचे दर सातत्याने आसमान सुसाट वेगाने गाठत आहेत.सोने दीड लाखांच्या उंबरठ्यावर उभे असताना चांदीने १६० टक्क्यांची वाढ नोंदवून सोन्यालाही मागे टाकले आहे.

चांदीच्या किमती वाढण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे या धातूचा औद्योगिक वापर.पूर्वी चांदीचा वापर प्रामुख्याने दागिने आणि नाणी बनविण्यासाठी केला जात असे.मात्र आता चित्र बदलले आहे. क्रांतीकारक ठरलेल्या सौर ऊर्जेचे पॅनल तयार करण्यासाठी चांदीचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.जसजसे देश कार्बन उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देत आहेत, तसतशी या क्षेत्रातील चांदीची भूक वाढत आहे.तसेच बॅटरी तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रिकल वाहनांच्या निर्मितीतही चांदीचा वापर अनिवार्य झाला आहे.आधुनिक काळातील स्मार्टफोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये चांदी ही एक सर्वोत्तम वाहक धातू म्हणून वापरली जाते.

पुरवठा मर्यादित असताना उद्योगांकडून येणारी ही मागणी चांदीला महाग करत आहे.सौरऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानामुळे चांदीला आता औद्योगिक सोन्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही सध्याच्या जगातील सर्वांत मोठी क्रांती ठरली आहे.एआय तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेले सर्व्हर,हाय स्पीड ट्रान्समिशन आणि स्मार्ट ग्रीड पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी चांदीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.डेटा सेंटरच्या उभारणीत आणि अत्याधुनिक संगणकीय प्रणालींमध्ये चांदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.एआय उद्योगाच्या विस्तारामुळे चांदीची मागणी भविष्यातही कायम राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढती तांत्रिक गरज यामुळे चांदीचे दर वेगाने वाढत आहेत.

जागतिक स्तरावर सध्या प्रचंड अस्थिरता आहे.युद्धाचे ढग आणि आर्थिक मंदीची भीती यामुळे गुंतवणूकदार शेअर बाजारापेक्षा धातू बाजाराला प्राधान्य देत आहेत.अमेरिकेतील केंद्रीय फेडरल बँक आपल्या व्याजदरात सातत्याने कपात करत आहे.जेव्हा व्याज दर कमी होतात,तेव्हा डॉलरची किंमत घटते आणि गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोने आणि चांदी खरेदीकडे वळतात. अमेरिकेतील मोठे गुंतवणूकदार सध्या चांदीमध्ये गुंतवणूक करणे लाभप्रद समजत आहेत.ही प्रवृत्ती केवळ व्यक्तींपुरती मर्यादित नाही.जगातील मोठे आणि प्रतिष्ठित बँका आता स्वतःचा चांदीचा साठा वाढवण्यावर भर देत आहेत.जागतिक स्तरावर म्युचुअल फंड्सनी देखील चांदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सुरू केली आहे.मोठ्या प्रमाणात सुरू झालेल्या चांदीच्या साठेबाजीमुळे किरकोळ बाजारपेठेवर त्याचा परिणाम होत आहे.

चांदीच्या बाबतीत एक तांत्रिक अडचण अशी आहे की, चांदीचे स्वतंत्र उत्पादन फार कमी होते.बहुतेक वेळा ती सोने,तांबे किंवा शिसे यांसारख्या इतर धातूच्या उत्खननात एक उप उत्पादन म्हणून मिळते.गेल्या अनेक वर्षांपासून चांदीच्या मूळ खाणकामात कोणतीही मोठी वाढ झालेली नाही. यामुळे नवीन चांदी बाजारात येण्याचे प्रमाण अत्यंत मर्यादित आहे. दुसरीकडे अमेरिकेने चांदीचे महत्त्व ओळखून ती अत्यंत संवेदनशील आणि दुर्मिळ धातूंच्या यादीत समाविष्ट केली आहे.अमेरिकेकडे सध्या सुमारे चौवन्न कोटी औंस चांदीचा साठा असल्याचे सांगितले जाते.जो त्यांच्या नेहमीच्या साठ्यापेक्षा तिप्पट आहे.चीनने देखील चांदीच्या निर्यातीवर कडक निर्बंध लादले आहेत. जगातील हे दोन मोठे देश जेव्हा चांदीची साठेबाजी करतात आणि निर्यातीवर बंदी घालतात, तेव्हा लंडन आणि न्यूयॉर्कच्या बाजारपेठेत चांदीचा तुटवडा जाणवू लागतो. या कमतरतेमुळे जागतिक स्तरावर चांदीच्या किमतीत भडका उडाला आहे. ज्येष्ठ पत्रकार,संपादक अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांनी आपल्या संपादकीय अग्रलेखात चांदीच्या किमतीत मोठ्या प्रमाणात का वाढ होत आहे

## सुविध कलेक्शन बोधेगांव यांचेकडून शाळेला स्पोर्ट ड्रेस...




अहिल्यानगर/ . केंद्र स्तरावर क्रीड़ा स्पर्धामधे ज़िल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा बालम टाकळीने घवघवित यश मिळाले. मुलांना स्पोर्ट ड्रेस ची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेऊन बोधेगांव येथील सुविध शांतिलाल बोथरा यांनी कबड्डी व खो खो मधील तीस मुलांना चांगल्या प्रतिचे स्पोर्ट ड्रेस दिले. सुविध कलेक्शन बोधेगांव यांच्या या योगदानबद्दल गावचे सरपंच डॉ राम बामदळे, शाळा व्यवस्थापन समिति अध्यक्ष बाबासाहेब सोनवने,उपाध्यक्ष सत्तार शेख मुख्यधपिका विजया कवडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृद रुस्तुम दौड, जयराम देवढे, दत्तात्रय मंजनर, दिगंबर गाडे कर, किरन बैरागी, बाळासाहेब गोरड़े अनीता हीवाले, मनीषा मिसाळ यांच्या वतीने सुविध बोथरा यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी नाथाभाऊ शिंदे, सतीश खेळकर उपस्थित होते.सुविध कलेक्शन यांच्या या योगदानंबद्दल गट शिक्षण अधिकारी शैलेजा राउळ मॅडम, विस्तार अधिकारी डॉ शंकर गाडेकर साहेब, केंद्रप्रमुख किसन राठोड साहेब व शाळा व्यवस्थापन समिति यांच्या वतीने अभिनंदन व कौतुक करण्यात आले

## कन्नड प समितीत कनिष्ठ लिपिक देव माने यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामाची चौकशी करण्यात यावी

कन्नड प्रतिनिधी _________

मनरेगा लाभार्थ्यावर अन्याय गट विकास अधिकाऱ्यांकडे तक्रार कन्नड तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत मनरेगा गंभीर स्वरूपाच्या अनियमितता होत असल्याचा आरोप आणि चर्चेला उदान आले आहे मनरेगा विभागातील कनिष्ठ सहायक लिपिक पंकज देव माने यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी अशी ठाम मागणी कन्नड येथील शेतकरी युवराज बोरसे यांनी केली आहे गटविकास अधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनात बोरसे यांनी नमूद केले आहे की संबंधित लिपिक




कामकाजात दिरंगाई व निष्काळजीपणा करत असून त्यांच्या कार्यकाळात वैयक्तिक सिंचन विहिरी गाय गोठे तसेच वृक्ष लागवड यासारखे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले आहेत परिणामी पात्रला भेटताना मनरेगा योजनेचा लाभ मिळालेला नाही याशिवाय लावेर त्यामध्ये समानता न ठेवता ठराविक लोकांनाच कार्यालयात बोलावून व्यवहार केला जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे कारण कामकाज आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून त्यामुळे संपूर्ण यंत्रेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे मनरेगासारख्या लोकाभिमुख योजनेत असा मनमानी कारभार सहन केला जाणार नाही याप्रकरणी सोबत चौकशी करून दोषी आढळल्या अधिक कार्यांवर घटनात्मक व प्रशासकीय कारवाई करावी अन्यथा शेतकरी व ग्रामस्थ रस्त्यावर उतरणार इशारा युवराज बोरसे यांनी दिला आहे



बीड : अँड. गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांची बीड नं. प. स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करतांना सोबत भाजपा नेते तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील,लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष भागवत (बीबी ) वैद्य, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी,बांधकाम मिस्त्री शेख चांद हे दिसत आहेत.

## वैराग्यमूर्ती हरिभक्त परायण वैकुंठवासी राष्ट्रसंत वामनभाऊ महाराज व ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांची संयुक्त पुण्यतिथी !

शिरूर कासार / सालाबादप्रमाणे यावर्षी दुपारी चार वाजता वैभव व्यायामशाळेत संतद्वयांच्या प्रतिमेचे पूजा करून भव्य मिरवणुकीस आरंभ करण्यात आला महिला सह भाविक भक्त मोठ्या संखेने सहभागी झाले होते . मिरवणूक केदार वस्ती, रामनगर, कोळवाडी चौक टाळ मृदंग वाद्यासह ज्ञानोबा माऊली जय करत लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकात बालगोपाळाचा रिंगण सोहळा दिंडीत टाळकरी आघाव महाराज , शिरसाठ



महाराज, बडे महाराज ,आदी सर्व भक्त सहभागी झाले होते कलाकारांनी आपापली कला सादर केली मराठी अकॅडमी डोंगरे सरचे इंगळे , केदार सर जायभाय सर शिरसाट सर सर्व शिक्षक वृंद यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले . सिद्धेश्वर संस्थान येथे खरमाटे महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन झाले कीर्तनाला साथ मानूर पिंपळगाव वारणी दहीहंडी आधी गावचे टाळकरी



भजनी मंडळ यांनी सहकार्य केले. उत्कृष्ट किर्तनाचा लाभ सर्व भाविक भक्तांना घेता आला त्यामुळे सर्वांचे आयोजकाच्या वतीने संस्थाचालक बाळासाहेब शिरसाट यांनी आभारप्रदर्शन केले . महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

## अहिल्यानगरचा महापौर कोण? चर्चेला उधाण, कुणाची लागणार वर्णी?

अहिल्यानगर | प्रशांत बाफना

महापालिका निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)-भाजप युतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. परंतु, अद्याप महापौर पदाचे आरक्षण निघालेले नाही. त्यामुळे महापौर पदाच्या आरक्षणाकडे विद्यमान नगरसेवकांसह अहिल्यानगरवासियांच्या नजरा लागल्या आहेत. अहिल्यानगरचा पुढचा महापौर कोण? या चर्चेला उधाण आले आहे. अहिल्यानगर महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्ये भाजप-राष्ट्रवादीच्या युतीला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) 27 जागा, भारतीय जनता पक्ष 25 जागा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शांच्या शिवसेनेला 10 जागा, काँग्रेसला दोन, एमआयएमला 2, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला 1, बहुजन समाज पक्ष 1 जागा मिळाली आहे.

महापौर पदाचे आरक्षण निघाले नसल्याने आरक्षणाकडे विद्यमान नगरसेवकांसह अहिल्यानगरकरांच्या नजरा लागल्या आहेत. आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतरच महापौर-उपमहापौर पदासाठी जोर बैठका सुरु होणार आहेत. आमदार संग्राम जगताप व माजी खासदार सुजय विखे पाटील कोणाच्या गळ्यात महापौर-उपमहापौर पदाची माळ घालतात हा चर्चेचा विषय ठरत आहे.

आतापर्यंत झालेले महापौर
भगवान फुलसौंदर (शिवसेना)
संदीप कोतकर (काँग्रेस)
संग्राम जगताप (राष्ट्रवादी)
शीला शिंदे (शिवसेना)
सुरेखा कदम (शिवसेना)
अभिषेक कळमकर (शिवसेना)
बाबासाहेब वाकळे (भाजप)
रोहिणी शेंडगे (शिवसेना)

महापौर पदासाठी आरक्षण सोडत पुढील आठवड्यात

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, कोल्हापूरसह राज्यातील 29 महानगर पालिकांचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. महापौर कोण होणार याची सर्वानाच उत्सुकता लागली आहे. आरक्षण सोडत निघाल्यानंतरच महापौर पदाचा चेहरा ठरणार आहे. महापौरपदाचे आरक्षण अद्याप जाहीर झाले नाही त्यामुळे नगरसेवकांची उत्सुकता वाढली आहे. पुढील आठवड्यात नगर विकास खाते महापौर सोडत काढणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. तर जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे

## साउथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी वेटलिफ्टिंग स्पर्धेत विष्णू भोईला रौप्य पदक; ऑल इंडिया स्पर्धेसाठी निवड

सोयगाव / ता..

प्रतिनिधी : सेगा युनिव्हर्सिटी, भोपाल येथे पार पडलेल्या साउथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी मेन वेटलिफ्टिंग टूर्नामेंट 2025–26 या स्पर्धा दिनांक 12 जानेवारी ते 15 जानेवारी 2026 दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाल्या.

या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. संघातील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा विद्यार्थी विष्णू भोई याने 110 किलो वजन गटात एकूण 305 किलो वजन उचलत रौप्य (सिल्वर) पदकावर आपले नाव कोरले. तसेच



60 किलो वजन गटात रुपेश सेन याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत 8वे स्थान मिळवले.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर विष्णू भोई व रुपेश सेन या दोन्ही खेळाडूंची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही बाब विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानास्पद मानली जात आहे.

या संघाला प्रशिक्षक तुषार सपकाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, तर डॉ. निलेश गाडेकर यांनी टीम मॅनेजर म्हणून संघाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

या यशामुळे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात मोलाची भर पडली आहे.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, प्रो-कुलगुरू डॉ. वाल्मीक सरोदे, प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे, तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष राजू भाऊ वैद्य, सचिव श्री. दीपक रुईकर, प्रा. भाऊसाहेब खरात, डॉ. अभिजीत दिख्खत, डॉ. हाश्मी सर, सुरेंद्र मोदी, गणेश कड, मोहन वाहिलवार, रामेश्वर विधाते आदी मान्यवरांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सोयगाव पंचायत समिती–जिल्हा परिषद निवडणूक पहिल्याच दिवशी 16 उमेदवारी अर्जाची विक्री



सोयगाव ता..

प्रतिनिधी सुनील चोरमले..

सोयगाव : तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तीन गट व सहा गणांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला शुक्रवारी (दि. 16) सुरुवात झाली. अर्ज दाखल पहिल्याच दिवशी एकूण 16 उमेदवारी अर्जांची विक्री झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिंगारे यांनी दिली. पहिल्या दिवशी प्रत्यक्ष एकही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आलेला नव्हता. मात्र दुपारी तीन वाजेपर्यंत आमखेडा, गोंदेगाव व फर्दापूर या तीन गणांसाठी 9 उमेदवारी अर्ज, तर सहा गणांसाठी 7 उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी रुपेश सिंगारे व सहाय्यक निवडणूक अधिकारी मनीषा मेने यांच्या अध्यक्षतेखाली सोयगाव तहसील कार्यालयात अर्ज विक्री व स्वीकृतीची प्रक्रिया सुरू आहे. एक खिडकी पद्धतीत तीन टेबलांवर ही प्रक्रिया राबविण्यात येत असून पहिल्या दिवशी उमेदवारांनी प्रामुख्याने माहिती घेऊन अर्ज खरेदी केल्याचे दिसून आले. रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक 21 पर्यंत उमेदवारी अर्जांची विक्री सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# अहिल्यानगर शहरात घरफोडी चोरी करणारा सराईत आरोपींकडुन 19,42,475/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत

अहिल्यानगर/ सावेडी, अहिल्यानगर शहरामध्ये घरफोडी चोरी करणारा सराईत आरोपींकडुन 19,42,475/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगरची कारवाई


प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, दिनांक 13/12/2025 रोजी सायंकाळी 06.00 वा ते दिनांक 16/12/2025 रोजीचे 12/00 वा.चे दरम्यान फिर्यादी हे कुटुंबासह जयपुर येथे नातेवाईकांचे कार्यक्रमास गेले होते त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराच्या मागील दरवाजाचे लॉक कशानेतरी तोडुन आत प्रवेश करुन घरामध्ये ठेवलेले 14,75,000/-रु किमतीचे सोने, डायमंड, चांदी व रोख रक्कम चोरुन नेले आहे. सदर घटनेबाबत फिर्यादी श्री अशोककुमार विजयकुमार अग्रवाल रा. बंगला क्र.06 विराज कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. 1191/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 331(3), 331(4), 305(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.



मा. श्री सोमनाथ घार्गे साहेब, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर शहरामध्ये घरफोडीचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते. सदर आदेशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रविंद्र पांडे, सुरेश माळी, गणेश धोत्रे, शाहिद शेख, फुरकान शेख, दिपक घाटकर, बिरप्पा करमल, सतिष भवर, रोहीत येमुल, अमृत आढाव, प्रकाश मांडगे, प्रशांत राठोड, भाग्यश्री भिटे, चालक भगवान धुळे यांचे पथक तयार करुन सदर पथकास घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना करण्यात आले होते. नमुद पथकाने गुन्ह्यातील आरोपींबाबत गोपनिय माहिती व व्यवसायीक कौशल्याचे आधारे माहिती संकलित करुन आरोपीचे शोध घेत असतांना पथकास सदरचा गुन्हा रमेश कुंभार रा. वर्तनगनर ठाणे याने केले असल्याची माहिती मिळाली. दिनांक 16/01/2026 रोजी पथकाने नमुद आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव 1) रमेश महादेव कुंभार वय 49 रा. अमाप रेसीडेन्सी, फलॅट नं.203, कशेळी, ठाणेअसे असल्याचे सांगीतले त्यास वरील गुन्हे बाबत विचारपुस करता त्याने सदरचा गुन्हा मी व माझे साथीदार 2) आशीष शिंदे रा. बारामती ता.बारामती जि. पुणे (फरार) अशांनी मिळुन केल्याची कबुली दिली आहे.

त्यानंतर ताब्यातील आरोपीचे ताब्यातुन व आरोपीचे सांगणे प्रमाणे 15,11,475/- रु कि.ची 104.670 ग्रॅम वजनाची सोन्याची लगड, 4,00,000/- रु की.ची मारुती सुझुकी कंपनीची SX4 मॉडेलची कार, 31,000/- रु की.चे सिल्व्हर रंगाचे मोठे 31 मोती, एक कटर, मोठे कटर असा एकुण 19,42,475/- रु कि.चा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## पिंपळगाव हायस्कुल पिंपळगाव शाळेची शैक्षणिक सहल संपन्न




केज (प्रतिनिधी) केज तालुक्यातील पिंपळगाव येथील श्री वडमाऊली शैक्षणिक, सामाजिक आणि संशोधन प्रतिष्ठाण बीड संचलित,पिंपळगाव हायस्कुल पिंपळगाव शाळेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या वर्षातील अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शैक्षणिक सहलीचे आयोजन दिनांक 15/01/2026 वार गुरुवार रोजी करण्यात आले होते. पहाटे 4:30 वाजता पिंपळगाव शाळेच्या आवारातून निघाली.या शैक्षणिक सहलीमध्ये घृनेश्वर ,वेरूळ ,भद्रा मारुती,सिद्धार्थ गार्डन अशा विविध ठिकाणी अभ्यासपूर्ण शैक्षणिक सहलीचे आयोजन करून त्या ठिकाणास भेटी देण्यात आल्या.

शाळेची शैक्षणिक सहल यशस्वीरित्या पार पडली असून, विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक स्थळे, पर्यटन स्थळे भेटी देऊन ज्ञानार्जन केले, तसेच शिस्त आणि सांघिक भावनेचे धडे घेतले; या सहलींमध्ये विध्यार्थी व विध्यार्थीनिनी उत्साह दाखवला असून, शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले, जेणेकरून विद्यार्थ्यांना अविस्मरणीय अनुभव मिळाला आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधला गेला.

श्री वडमाऊली शैक्षणिक, सामाजिक आणि संशोधन प्रतिष्ठाण बीड संस्थेचे अध्यक्षा सौ.डॉ. अनिता शशिकांत दहिफळकर व सचिव श्री. डॉ. शशिकांत शामराव दहिफळकर यांनी परवानगी दिली.व ही शैक्षणिक सहल यशस्वी करण्यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री हनुमंत ढाकणे सर,श्री. बिक्कड सर, ठोंबरे सर,श्रीमती गायकवाड मॅडम,श्रीमती शेख मॅडम, श्री. वैभव ठोंबरे सर,राहुल वाघमारे, श्रीमती कोकाटे यांनी मोलाचे योगदान दिले.

# स्वाराती'तील सुविधांचा खा.बजरंग सोनवणे घेणार आढावा

## १९ जानेवारीला सर्व वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी राहणार उपस्थित

अंबाजोगाई /प्रतिनिधी
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रुग्णसेवा, आरोग्य सुविधा, मनुष्यबळ, औषध साठा, पायाभूत सुविधा तसेच प्रलंबित विविध प्रश्नांबाबत खा.बजरंग सोनवणे सविस्तर आढावा घेणार आहेत. सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांच्या पुढाकारातून सदर बैठक आयोजित करण्यात येत असून, यासंदर्भात रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास पत्राद्वारे सूचनाही दिल्या आहेत. सदर बैठकीस संबंधित विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासनातील जबाबदार अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्यसेवा मिळावी, रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात यावा, या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या बैठकीत रुग्णसेवेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात येणार असून, आरोग्य यंत्रणेमधील समन्वय अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यात, आरोग्य, शिक्षण, दळवळण अशा विषयांना कायम महत्व दिलेले आहे. आरोग्य विभागातील अडचणी सोडविण्यासाठी ते तत्पर असतात. जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रात देखील ते सरप्राईज व्हिजीट करत असतात. यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क असते. जिल्ह्यातील रूग्णांना दर्जेदार उपचार, सुविधा मिळाव्यात यावर खा.बजरंग सोनवणे यांचा भर आहे.

# आदर्श आवरगाव पूर्णतः सीसीटीव्ही निगराणीत; ३२ कॅमेरे कार्यान्वित

## सीसीटीव्ही यंत्रणेमुळे चोरी,गैरप्रकार,अपघात तसेच समाजविघातक घटनांवर आळा बसणार –आदर्श सरपंच अमोल जगताप.

**किल्ले धारूर /** धारूर तालुक्यातील आवरगाव येथे गावातील सुरक्षितता, शिस्त आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण या उद्देशाने आदर्श अवरगाव हे गाव आता पूर्णतः सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आले आहे.गावाच्या विविध ठिकाणी व प्रमुख चौका चौकात एकूण ३२ सीसीटीव्ही कॅमेरे यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आले असून, त्यामुळे अवरगाव हे परिसरातील एक सुरक्षित व आदर्श गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.
गावातील मुख्य चौक,गाव अंतर्गत रस्ते, शाळा परिसर,मंदिर परिसर मुख्य रस्ता तसेच वर्दळीची ठिकाणी अशा महत्त्वाच्या भागांमध्ये हे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही



यंत्रणेमुळे चोरी गैरप्रकार, अपघात तसेच समाजविघातक घटनांवर आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे असे मत आवर गावचे आदर्श सरपंच अमोल जगताप यांनी व्यक्त केले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, गावात शिस्त आणि स्वच्छता राखण्यासही हातभार लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी होणाऱ्या हालचालींवर व चोऱ्या यांवर लक्ष ठेवता येणार असल्याने महिलांमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.
ग्रामपंचायत व सर्व सदस्य ,ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. भविष्यात कॅमेऱ्यांची संख्या वाढवण्याचा तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रणाली अधिक सक्षम करण्याचा मानस ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.
संपूर्ण सीसीटीव्ही निगराणीमुळे आदर्श अवरगाव हे इतर गावांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरत असून, सुरक्षित व शिस्तबद्ध गावनिर्मितीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# कुसुमताई चौधरी जयंतीनिमित्त फैजपूर येथे जिल्हास्तरीय गीतगायन स्पर्धा

## सारिका प्रथम, कोहिनूर द्वितीय; सांगवी शाळेचे जिल्हास्तरावर यश

### जळगाव जिल्हा प्रतिनिधी हमीद तडवी

कुसुमताई सांस्कृतिक मंच, फैजपूर यांच्या वतीने कुसुमताई चौधरी जयंतीनिमित्त दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी कुसुमताई माध्यमिक विद्यालय, फैजपूर येथे जिल्हास्तरीय गीतगायन स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जळगाव जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.
या स्पर्धेत ज्योती विद्या मंदिर, सांगवी बुद्रुक ता. यावल येथील दोन विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल व प्रभावी गायनाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकत उल्लेखनीय यश संपादन केले. पाचवी ते सातवी वयोगटात इयत्ता सातवीची विद्यार्थिनी सारिका सारंग



तायडे हिने भावपूर्ण व तालबद्ध सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. तर आठवी ते दहावी वयोगटात इयत्ता दहावीचा विद्यार्थी कोहिनूर सारंग तायडे याने शास्त्रशुद्ध व प्रभावी गायन सादर करून द्वितीय क्रमांक मिळवला.
या यशामुळे ज्योती विद्या मंदिर, सांगवी बुद्रुक या शाळेचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल झाले असून शाळा परिसरात आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गावकरी, पालकवर्ग तसेच विविध सामाजिक संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. एम. भंगाळे, पर्यवेक्षक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असून कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विशेष प्रोत्साहन दिले जाते, असे यावेळी सांगण्यात आले. कोहिनूर व सारिका हे बहिण-भाऊ असून दोघांनाही गायनकलेची उपजत देणगी लाभली आहे. सातत्यपूर्ण सराव, कुटुंबीयांचे पाठबळ आणि शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याचे मार्गदर्शक शिक्षक श्री. पंकज भंगाळे यांनी सांगितले. भविष्यात हे दोघेही संगीत क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# गांजपूर जीवन शिक्षण विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न.

## विद्यार्थ्यांनी घेतले ऐतिहासिक स्थळांची माहिती.



किल्ले धारूर / धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल 2026 ही पुणे, नाशिक परिसरात ऐतिहासिक स्थळांची माहिती घेत उत्साहात संपन्न झाली. तालुक्यातील गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हे उपक्रमशील विद्यालय आहे विद्यार्थ्यांना शैक्षणिक बरोबरच ऐतिहासिक स्थळांची माहिती व्हावी पर्यटनाचा अनुभव यावा यासाठी प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती ही सहल उत्साहात संपन्न झाली. या सहलीमध्ये तब्बल 40 विद्यार्थी व 4 शिक्षक सहभागी झाले होते शैक्षणिक सहल 2026 नाशिक,त्रंबकेश्वर, पुणे सिंहगड, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर वेरूळ लेणी, घृष्णेश्वर अशा विविध भागांमध्ये गेली होती. सर्व भागाची सखोल माहिती विद्यार्थ्यांनी घेतली शैक्षणिक सहल उत्साहामध्ये संपन्न झाली या सहलीत तब्बल 40 विद्यार्थी यांच्यासोबत प्राचार्य विजयकुमार मुंडे सहशिक्षक महादेव केदार, सहशिक्षिका सौ भारती सोनवणे सौ मंगल वटाणे सभागी झाले होते. अतिशय उत्साहात व आनंदीमुळे वातावरणामध्ये ही चार दिवसीय सहल संपन्न झाली.

# यशोदीप पब्लिक स्कूलमध्ये चिमुकल्यांची 'आनंदनगरी'–तब्बल दीड लाखांची उलाढाल

## आनंदनगरीतून व्यवहाराचे धडे;११० दुकानांतून विद्यार्थ्यांनी अनुभवली खरी कमाई –शीतल जगताप

**किल्ले धारूर /** धारूर शहरातील यशोदीप पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे, तसेच खरी कमाई म्हणजे काय हे समजावे, या उद्देशाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने 'चिमुकल्यांची 'आनंदनगरी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
या आनंदनगरीतून तब्बल १ लाख ५० हजार रुपयांची उलाढाल झाली असून, हा उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे.
या आनंदनगरीमध्ये तब्बल ११० दुकाने थाटण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीच या दुकानांचे व्यवस्थापन करत खरेदी-विक्री, नफा-तोटा, व्यवहाराची शिस्त याचे प्रत्यक्ष धडे घेतले. किलबिलत्या बाजारपेठेमुळे संपूर्ण आनंदनगरीला जत्रेचे स्वरूप आले होते. या






उपक्रमाचा आनंद केवळ चिमुकल्यांनीच नव्हे तर पालकांनीही मनमुराद घेतला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन सौ. शीतल अविनाश जगताप (संचालिका,आरूष प्रोॲक्टिव्ह अबॅकस किल्ले धारूर) यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. किरण नितीन शुक्ला (संचालिका, आदर्श कोचिंग क्लासेस) उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीत आनंदनगरीला उत्साहात सुरुवात झाली.
आनंदनगरीमध्ये विद्यार्थ्यांनी लावलेले पौष्टिक व स्वादिष्ट पदार्थांचे स्टॉल्स विशेष आकर्षण ठरले. यामधून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी आहाराबाबत जागरूकता निर्माण झाली. शाळेच्या वतीने सर्वोत्तम पौष्टिक आहार या स्टॉलला विशेष बक्षीस देऊन प्रोत्साहन देण्यात आले. हा संपूर्ण उपक्रम शाळेचे संचालक विशाल दिखत सर व प्राचार्य चित्रा दिखत मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशोदीप पब्लिक स्कूलच्या सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले.

# वडती येथील कुमार राधेशाम अशोक कंडारे यास काव्य रत्न पुरस्कार जाहीर

विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा या मंचाच्या नाशिक शाखेच्या वतीने गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत नाशिक जिल्हास्तरीय समरसता साहित्य संमेलनाचे आयोजन कुसुमाग्रज स्मारकाच्या विशाखा सभागृहात करण्यात आले आहे. या समरसता संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिध्द कीर्तनकार आणि कवी ह. भ. प. श्री. शामसुंदर महाराज सोन्नर आळंदीकर यांची निवड करण्यात आली आहे.




ज्येष्ठ कवयित्री सौ. हेमलता गिते यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाची संयोजन समिती व संयोजक श्री. शिवराज पाटील हे आहेत.
विश्वात्मक मराठी साहित्य कट्टा यांच्या कडुन हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील 51 कवींची निवड करण्यात आली असुन त्यांना गौरवपदक, महावस्त्र, श्रीफळ व मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

कवी-लेखकांचा खुला परिसंवाद आयोजित करण्यात आला असून परिसंवादाचा विषय "मराठी साहित्याने मला काय दिले?" असा आहे. या संमेलनाच्या समारोप सत्रात "कविमनाची आरोळी .... विश्वात्मक चारोळी" अशी उत्स्फुर्त चारोळी सादरीकरण स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे.

काव्यरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर वडती गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावातील नागरिक, पुज्य साने गुरुजी माध्य. विद्यालय वडती येथील शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी, व मित्र परिवार यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अर्चना सुरेश कुटेला बीडकडे घेऊन येताना पोलीस व्हॅनचा भीषण अपघात..


## अपघाताचा सीसीटीव्ही व्हायरल;दुचाकीस्वार गंभीर जखमी



बीड(प्रतिनिधी)बीड सह महाराष्ट्रात ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळा प्रकरणातील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाल्याने अटकेत असलेले मुख्य आरोपी सुरेश कुटे व त्यांची पत्नी अर्चना कुटे यांना केज येथून बीड पोलिसांच्या ताब्यात देण्यासाठी पोलीस व्हॅनने आणत असताना नेकनूर–येळंब मार्गावर शुक्रवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास पोलीस वाहनाची समोरून येणाऱ्या मोटरसायकलशी जोरदार धडक झाली.या धडकेत मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय अक्षरशः तुटल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. अपघाताची तीव्रता इतकी होती की दुचाकीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.दरम्यान, पोलीस ताब्यात असलेल्या अर्चना कुटे यांनाही या अपघातात दुखापत झाली असून त्यांच्यावर वैद्यकीय तपासणी करून उपचार करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. आरोपी सुरेश कुटे यांना मात्र कोणतीही गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर आलेली नाही.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे काही काळ नेकनूर–येळंब रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. अपघाताची नोंद संबंधित पोलीस ठाण्यात करण्यात येत असून वेग, रस्त्याची अवस्था किंवा निष्काळजीपणा यापैकी नेमके कारण काय, याचा तपास सुरू आहे. आरोपींच्या पोलीस बंदोबस्तातील प्रवासादरम्यान झालेल्या या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# अतिक्रमण धारकांच्या पुनर्वसणासाठी जागेची चाचपणी!शिरुरची बाजारपेठ स्थिरावण्यासाठी व्यवसायिक कॉप्मलेक्स उभारणार - मुख्याधिकारी दहिफळे


शिरुरकासार:/ शिरुर कासार शहरातील वाढत्या रहदारीनुसार अवास्तव अतिक्रमणामुळे बाजारपेठेलाच स्थलांतराचे हादरे बसत आहेत. शहरची नावाजलेली बाजारपेठ स्थिरावण्यासाठी अतिक्रमणासह बाजारकरूंच्या मुलभूत सुविधांसाठी उपाययोजनांचा पर्यायासाठी नगरपंचातीचे मुख्याधिकारी गणेश दहिफळे यांनी शुक्रवारी (दि. 16) शहरातील अतिक्रमण हटवण्याच्या पहिल्या टप्यात प्रारंभ केला. लवकरच शहरातील मोकळ्या जागेत व्यवसायिक कॉम्पलेक्स उभारण्यासाठी जागेची चाचपणी करण्यात येणार असून बीओटी तत्वावर गाळे वाटपामध्ये अतिक्रमणधाराकांच्या पुनर्वसास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी दहिफळे म्हणाले. शिरुर शहराची जुनी बाजारपेठ निमुळत्या रस्त्याअभावी जिजामाता चौक ते छत्रपती संभाजीमहाराज चौक या मुख्यरस्त्यावर मागील पंधरा वर्षापासून स्थिरावली आहे. पारंपारिक आठवडी बाजार जुन्या बाजार तळावरच भरत असला तरी जागे अभावी शेळ्यांच्या बाजारावर टाच आली असून बैल बाजार लॉकडाऊनच्या कालावधीपासून बंद आहे. निमुळते रस्ते, पार्कींचा अभाव, वाढते अतिक्रमण या नियमित समस्यांमुळे रस्ते, नाली, पिण्याचे पाणी, स्वच्छातगृहांचा प्रश्न जटील बनला आहे. तुंबलेल्या नाल्या, रस्त्यांवरील निमुळत्याची आडकाठी, स्वच्छतागृह यासह बाजारपेठेचा कोंडलेला श्वास मोकळा होणार कधी? मुलभूत गरजांची फळे नगारिक चाखणार कधी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहराच्या मुख्य रस्त्यावर तुंबलेल्या नाल्यातून दुर्गंधीयुक्त पाणी प्रवाहीत होत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तुंबलेल्या नाल्यां प्रवाहीत करण्यासाठी किमान नालीवरील अतिक्रमण हटविणे अवश्यक असल्याचे सामान्य नगारिकांसाठी लक्षवेधी ठरत आहे. शहराचे वैभव टिकविण्यासाठी किमान बाजारपेठ स्थिरावणे ही काळाची गरज असल्याने कर्तव्यकठोर, निष्पक्ष तरुण मुख्याधिकारी गणेश दहिफळे यांनी शुक्रवारी थेट अतिक्रमणावरच बुलडोझर फिरवण्यास सुरूवात करून शहर विकासाला नवी दिशा देण्यास प्रारंभ केला आहे. निमुळत्या रस्त्यांमुळे शहराच्या जुन्या बाजारपेठेतून व्यवसायीकांनी छत्रपती संभाजी महाराज चौक ते जिजामाता चौक या मुख्यरस्त्यावर स्थलांतर केले हे वास्तव नकाराता येणार नाही. प्रत्यक्षत शहर विस्तारीकरणामुळे बाजारपेठे वाढते हे सत्य असले तरी किमान मुख्य बाजारपेठ स्थालांतरीत होणं हे शराच्या वैभवाला खिळ बसण आहे.



दरम्यान शिरुर शहराच्या विकासाला चालणा देण्यासाठी प्रसंगी कर्तव्य कठोर निर्णय घ्यावे लागले तरी मागे हटणार नसल्याचे सांगत मुख्याधिकाऱ्यानी शिरुरकरांच्या मुलभूत गरजांसाठी उपाय योजनांचा रोडमॅप सांगितला आहे. मुख्याधिकारी दहिफळे म्हणाले की, शहरविकासाठी सभागृहाची धडपड आणि पदाधिकाऱ्यांची तळमळ लक्षात घेवून लवकरच शहरातील मुख्यरस्त्याच्या नाल्यांवरील अतिक्रमण हटवून तुंबलेल्या नाल्या प्रवाहित करण्यात येणार आहेत. नियमित पाणीपुरवठ्यासाठी उपाय योजना राबवून कुलूप बंद स्वच्छतागृह वापरासाठी खुले करण्यात येणार आहेत. टप्प्या टप्प्याने वाहतूकीस अडथळा ठरणारे रस्त्यावरील अतिक्रमण, शहराचे वैभव टिकविण्यासाठी प्रत्येक चौकाचा कोंडलेला श्वास मोकळा करण्यात येणार आहे. जागेचे कारण पुढे करत तालुकास्तरीय प्रशासकिय कार्यालये नगरपंचायत कार्यक्षेत्राच्या बाहेर गेली आहेत. त्यामुळे शिरुर शहराच्या शाश्वत विकासाला दृष्ट लागल्याचे चित्र आहे. किमान आहे ते टिकवण्यासाठी नागरिकांनीच पुढाकार घेण्याची वेळ येवून ठेपली आहे. नगरपंचायत प्रशासनाने हाती घेतलेल्या मोहिमेत शहरवासीयांनी स्वयंपूर्तीने सहभागी होण्याचे गरज आहे. शहराचे वैभव टिकून बाजरपेठ स्थिरावण्यासाठी लवकरच शहरात व्यवसायिक कॉम्पलेक्सचे ट्रक्चर उभारण्याच्या उद्देशाने जागेची चाचपणी करण्यात येणार आहे. बीओटी तत्वावर गाळे उभारुन अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनास प्राधान्य दिले जाणार असल्याने शहरवासीयांनी विधायक कामासाठी सहकार्याचे आवाहन मुख्याधिकारी दहिफळे यांनी केले आहे. शहरवासीयांसह बाजारकरूंच्या मुलभूत गरजांना प्राधान्य: शहरातील रस्ते, नाल्या, धुळ, स्वच्छता, स्वच्छतागृह यासह नियमित पाणीपुरठ्याच्या कामांना प्राधान्य देवून पहिल्या टप्यात विकास कामांना अडसर ठरणारे अतिक्रमण हटवण्यात येणार आहे. मुख्यरस्त्यारील अतिक्रमणावर हातोडा : तुंबलेल्या नाल्या प्रवाहित करण्यासाठी लवकरच छत्रपती संभाजी महाराज चौक ते जिजामाता चौक या मुख्यरस्त्याच्या नाल्यांवरील अतिक्रमणावर हातोडा पडणार आहे. नागरिक व्यवसायिकांनी स्वयंपूर्तीने अतिक्रमण हटवून विधायक कामात योगदानाचे द्यावे.
मुख्याधिकारी गणेश दहिफळे

# सुनील बावणे - निल यांना विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार प्रदान

कवी, गझलकार सुनील बावणे - निल यांच्या स्याडा कोटसा भरते या झाडीबोलीत काव्यसंग्रहाला नवोदित साहित्य लेखन पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. दिनांक १४ जानेवारी २०२६ ला नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक मान. सुनील कुमार लवटे, नागपूर विद्यापीठ कुलगुरू मान. मनाली क्षीरसागर , मान. मिलिंद जोशी सर पुणे, नि. न्या. विकास शिरपूरकर सर, विश्वस्त मान. रवींद्र ठाकरे, वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीपजी दाते, उपाध्यक्ष मान. राजेंद्र डोळके, सरचिटणीस मान. विलास मानेकर आणि उपस्थित सर्व साहित्यिक मान्यवर यांच्या उपस्थितीत सुनील बावणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विदर्भ साहित्य संघाच्या नामांकीत पुरस्कारापैकी हा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या झाडीबोलीतील कविता व गझल लिखनाला आणखीनच नवचैतन्य निर्माण होईल असे मत कवी लेखक गझलकार सुनील बावणे यांनी व्यक्त केले आहे. यापूर्वीही त्यांना अनेक साहित्य मंचाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. सुनील बावणे हे एका गाव खेडे वायगांव ( तु.) इथून आपली साहित्यिक आवड जोपासत, बल्लारपूर पेपर मिल येथे कामगार असून कामगार क्षेत्रात काम करत असताना सुद्धा साहित्याची आवड जोपासत प्रमाण मराठी भाषेसोबतच झाडीबोलीतील लिखाण करणारे लेखक म्हणून त्यांची साहित्य क्षेत्रात ओळख आहे. त्यांच्या या नावीन्यपूर्ण लिखाणासाठी आजपर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. नुकताच त्यांचे जन्म गावी जय हिंद फाउंडेशन आणि जगन्नाथ बाबा महाविद्यालय तसेच गावकऱ्यांच्या आयोजित एका स्नेह मिलन कार्यक्रमांमध्ये त्यांच्या या साहित्य कृतीचा सन्मान म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या साहित्य सेवेसाठी कामगार क्षेत्रातून, रसिक, मित्र वर्गातून आप्त परिवाराकडून त्यांच्या समोरील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले आहे.



दैनिक लोकआरंभ
रविवार १८ जानेवारी २०२६
www.lokaarambh.com



# मुंबईत महापौर कोण?

## मुख्यमंत्री फडणवीस देणार धक्का यांची नावे आघाडीवर

मुंबई: / संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीचा पराभव झाला. भाजप आणि शिवसेनेने बहुमताचा आकडा पार करत मुंबईची सत्ता काबीज केली. त्यानंतर आता मुंबईचा महापौर कोण होणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मुंबईत भाजप सार्वात मोठा पक्ष ठरल्याने भाजपचाच महापौर होणार, हे स्पष्टच आहे. मुंबईतील ठाकरेंची 25 वर्षांपासूनची सत्ता उखडून टाकण्यात अखेर भाजपला यश आले आहे. भाजप 89 जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला 29 जागांवर विजय मिळाला आहे. बहुमतापेक्षा त्यांच्याकडे चार नगरसेवक अधिक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईचा महापौर हिंदू आणि मराठीच होईल, असे स्पष्ट केले आहे. भाजपमधील 89 नगरसेवकांमध्ये अनेक मातब्बर चेहरे आहेत. त्यामध्ये ठाकरेंची शिवसेना, काँग्रेसमधून आलेल्या काही नेत्यांचाही समावेश आहे. तसेच नेत्यांचे नातेवाईकही निवडून आले आहेत. त्यामुळे महापौरपदासाठी मोठी रस्सीखेच असणार, हे



स्पष्टच आहे. त्यासाठी मोठे लॉबिंगही सुरू होईल. अर्थात ही सर्व गणितं महापौरपदासाठी आरक्षणावर अवलंबून असणार आहेत. महापौरपदासाठीची चर्चेतील नावे: मुंबई महापालिकेत मिळालेल्या विजयानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचा महापौर असेल असे आज स्पष्ट केले आहे. महापौरपदाच्या शर्यतीत तेजस्वी घोसाळकर, मकरंद नार्वेकर, प्रकाश दरेकर, प्रभाकर शिंदे, प्रीती सातम, उज्वला मोडक डॉ. प्रज्ञा सामंत, राजेश्री शिरवडकर, शीतल गंभीर देसाई यांची नावे चर्चेत आहेत. महापालिका निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या तीन दशकांच्या सत्तेला या निवडणुकीत धक्का बसला आहे. या विजयाला फडणवीस यांनी 'विकासाभिमुख शासनाचा विजय' असे म्हटले आहे. राज्यात नवीन राजकीय युगाची सुरुवात झाली आहे. हा विजय भाजपसाठी ऐतिहासिक मानला जात आहे. या विजयामुळे महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात मोठे बदल घडले असून, नागरी प्रशासनात नवीन पर्वाची सुरुवात झाली आहे. असे ते म्हणाले.

## (माजलगाव प्रतिनिधी दिनांक १७/०१/२०२६)श्री सिद्धेश्वर संकुलाचा माजी विद्यार्थी डॉ. आदित्य लक्ष्मीकांत सोन्नर चे M.D स्किन परीक्षेत उत्तुंग यश....

**डॉ आदित्य प्रतिभा लक्ष्मीकांत सोन्नर याने* (MBBS ) M.D स्किन परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत घवघवीत यश संपादन केले**

मंगळवार दिनांक 13 /1/ 2026 एमडी चा निकाल जाहीर झाला त्यामध्ये आमचे *डॉ. आदित्य सोन्नर M.D. ( Skin ) या अत्यंत महत्वपूर्ण व कठीण असलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले त्याबद्दल सर्वप्रथम डॉ. आदित्य याचे मनःपूर्वक अभिनंदन !व त्याला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !! आज संकुलासाठी तसेच आम्हा सर्वांसाठी अत्यंत आनंदाचा व गौरवाचा दिवस व क्षण आहे .

डॉ.आदित्यचा जन्म येल्डा ता. अंबाजोगाई येथे झाला असून त्याचे पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल माजलगाव येथे संपन्न झाले. अकरावी व बारावीचे शिक्षण लातूर येथील राजश्री शाहू महाविद्यालय येथे पूर्ण केले. तर एम.बी.बी.एस. चे शिक्षण केले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) संभाजीनगर येथे पूर्ण केले. मायमर हॉस्पिटल तळेगाव दाभाडे पुणे येथे डॉ. आदित्यने वैद्यकीय



क्षेत्रातील अत्युच्च अशा एम.डी. सारख्या कठीण परीक्षेमध्ये यश मिळवून आकाशाला गवसणी घातली आहे .

डॉ.आदित्य याचे वडील प्रा. श्री. लक्ष्मीकांत नरहरी सोन्नर हे श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे गत तीस वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. ते आदर्श शिक्षक व आदर्श पालक असून ते सामाजिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर असणारे असे आहेत. घरातूनच शिक्षणाचे बाळकडू आदित्यला प्राप्त झाले आहे

डॉ.आदित्य हा अत्यंत गुणी, सदाचारी, व्यवहार कुशल, प्रामाणिक, उच्च विद्याविभूषित , त्वचारोग तज्ञ, अत्यंत शांत, संयमी बुद्धिमान , जिद्दी , धाडसी, उत्तम वक्ता, कष्टाळू ,मेहनती ,अभ्यासु, उत्तम खेळाडु ,विशेषत्वाने क्रिकेट व कॅरम पटू,योग व अभ्यासाची आवड असणारा,आज्ञाधारक, आणि भविष्याची अचूक माहिती व वेध घेवून जागरूक असणारा डॉ. आदित्य हा आमच्या कुटुंबासाठी संकुलासाठी व सर्व आप्तेष्ट नातेवाईक गावकरी यांच्यासाठी आदर्श व प्रेरक असा गुणी व आदर्श मुलगा आहे ! डॉ.आदित्यचा लहान भाऊ डॉ. अजिंक्य हा देखील अमरावती येथे एम.बी.बी.एस. अंतिम वर्षात शिकत आहे . परम पिता परमेश्वर तुला उदंड व निरोगी आयुष्य प्रदान करून तुझ्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण करो !

तुझ्या हातून गोरगरिबांची दीनदुबळ्यांची रुग्णसेवा घडत राहो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना *! या घवघवीत यशाबद्दल डॉ.आदित्य चे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्र कार्यकारणी सदस्य प्रकाशभाऊ दुगड, अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, अँड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, शिशुविहार चे अध्यक्ष बाबू जोशी, लक्ष्मीकांत जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्रा, डॉ.युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार, मुख्याध्यापक संतोष लिंबकर,सौ.सुमती भारती, अनंत रुद्रवार, गोविंद बजाज, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, सुधीर नागापुरे,दत्ता येवले यांच्यासह सर्व शिक्षक, आप्तेष्ट, वकील, डॉक्टर आदी नागरिकांनी डॉ. आदित्यचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत .

## काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर, भाई जगताप यांना कारणे दाखवा नोटीस



राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, आता पुन्हा एकदा काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने (AICC) मुंबईतील काँग्रेस नेते व विधानपरिषदेचे सदस्य भाई जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा प्रा. वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची सार्वजनिक मागणी केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव यू. बी. वेंकटेश यांनी 17 जानेवारी 2026 रोजी जारी केलेल्या नोटीसमध्ये, भाई जगताप यांनी माध्यमांमध्ये केलेली वक्तव्ये पक्षशिस्तीचे उल्लंघन असल्याचे नमूद केले आहे. पक्षातील संघटनात्मक बाबी, नेतृत्व व मतभेद सार्वजनिक मंचावर मांडणे चुकीचे असून ते अंतर्गत व्यासपीठावरच मांडणे अपेक्षित असल्याचे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. अशा वक्तव्यांमुळे पक्षाची प्रतिमा मलीन होते, गोंधळ निर्माण होतो आणि संघटनात्मक एकतेला धक्का बसतो, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांत लेखी स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले असून, समाधानकारक उत्तर न दिल्यास शिस्तभंगाची पुढील कारवाई केली जाईल, असा इशाराही या पत्राद्वारे भाई जगताप यांना देण्यात आला

## नालेगावात राडा, माळीवाड्यात राडा, सारसनगरमध्ये तरुणावर सपासप वार; निवडणूक निकालानंतर कुठे काय

अहिल्यानगर | महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर नालेगावमध्ये चांगलाच राडा झाला. विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी पराभूत उमेदवाराच्या कार्यकर्त्यांच्या घरासमोर जावून घोषणाबाजी केली. त्यातून कवडे आणि वाघ समर्थकांमध्ये वादावादी झाली. या घटनेमुळे नालेगाव परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील नालेगाव परिसरातील लांडे गल्लीत शुक्रवारी रात्री आपसात वादावादी करणाऱ्या चार जणांविरुद्ध कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शांततेचा भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, 16 जानेवारी महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर प्रभाग 11 मधील विजयी उमेदराच्या समर्थकांनी जल्लोष केला. तसेच भाजप पराभूत उमेदवाराच्या कट्टर समर्थकाच्या घरासमोर जावून विजयी उमेदवाराच्या समर्थकांनी जल्लोष करत घोषणाबाजी केली. तेथूनच वातावरण तापले. दोन्ही उमेदवारांचे समर्थक आमने सामने आल्याने नालेगावमध्ये काही काळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी हस्तक्षेप केल्याने वाद मिटला. दरम्यान, शुक्रवारी रात्री 11 वाजेच्या सुमारास नालेगाव येथील लांडे गल्लीत काही तरुण आपसात भांडण करत असल्याची माहिती कोतवाली पोलीस स्टेशनला मिळाली होती. या माहितीवरून गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, सूरज कदम व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्या ठिकाणी चार जण एकमेकांच्या अंगावर धावून जात वादावादी करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र ते कोणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.अखेर पोलिसांनी चौघांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले. त्यांची चौकशी केली. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सूरज दिलीप कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

द्वारकाधीश कॉलनीतील कुटुंबावर जीवघेणा हल्ला भिंगार परिसरातील आलमगीर येथील द्वारकाधीश कॉलनीतील एका कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार घडला. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात निखिल देवीराम धुलिया ( रा. द्वारकाधीश कॉलनी, भिंगार जि. ता. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी नरेंद्र गजानन कनोजिया, पारस गजानन कनोजिया, ऋतिक धीरज परदेशी, ज्योती गोपीचंद कनोजिया, ममता अजय परदेशी आणि सागर उर्फ विकी गोपीचंद कनोजिया सर्व ( रा. द्वारकाधीश कॉलनी, भिंगार जि. ता. अहिल्यानगर) यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. मध्ये जुन्या भांडणाच्या कारणावरून वरील आरोपींनी कुटुंबावर बेकायदेशीर जमाव जमवून हल्ला केला. आरोपींनी लोखंडी रॉड, लाकडी दांडके आणि दगडांचा वापर करून फिर्यादीच्या आई-वडिलांना आणि बहिणीला बेदम मारहाण केली. यावेळी पारस कनोजिया याने 'तुला कायमचा संपवतो' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर करत आहेत.

माळीवाड्यात राडा; तरुणावर हल्ला
शहरातील माळीवाडा परिसरातील कपिलेश्वर चौकात धंद्याच्या वादातून राडा झाल्याची घटना घडली. लोखंडी फायटरने तरुणावर हल्ला केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अनिल रमेश आरडे ( रा. शिंदे गल्ली, माळीवाडा, जि. ता. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी प्रमोद साठे, अभिजित साठे, प्रशांत साठे सर्व ( रा. माळीवाडा, जि,. ता. अहिल्यानगर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अनिल रमेश आरडे यांचा लॉन्ड्रीचा व्यवसाय आहे. गुरुवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास ते शिवम सायकल दुकानाच्या ओट्यावर बसलेले असताना, ओळखीचा प्रमोद दिनकर साठे तेथे आला. 'आमच्या धंद्याकडे का येतो?' असे म्हणत त्याने आरडे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही वेळातच अभिजित साठे, प्रशांत साठे आले. यावेळी प्रशांत साठेने हातातील लोखंडी फायटरने आरडे यांच्या डाव्या डोळ्यावर प्रहार केला. तसेच इतर दोघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आरडाओरडा झाल्याने स्थानिक नागरिक मदतीला धावून आले असता, तिन्ही आरोपी तेथून पळून गेले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार औटी करत आहेत.

सारसनगर पुलावर तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार
शहरातील सारसनगर परिसरातील तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार केल्याची घटना घडली. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .सारसनगर पुलाजवळ दारू पिण्याच्या वादातून सदरचा प्रकार घडला. जखमी गणेश नितीन गायकवाड (वय 26, रा. भगवानबाबा चौक, सारसनगर) यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे. सारसनगर पुलाजवळ दि. 15 जानेवारी रोजी रात्री जखमी गणेश गायकवाड यांना मयूर छबुराव कांडेकर व त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांनी अडवले. 'तू दुसऱ्या धंद्यावर दारू पिण्यासाठी का जातो?' असा जाब विचारत आरोपींनी वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.आरोपींनी गणेश गायकवाड यांनाअर्वाच्य शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याच दरम्यान एका आरोपीने जवळ असलेल्या धारदार शस्त्राने त्यांच्या पाठीवर सपासप वार केले. झटापटीत त्याच्या खिशातील रोकडही गहाळ झाल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार धर्मनाथ पालवे करत आहेत

## ठरलं! महापौर एकनाथ शिंदेंचाच, फडणवीसांना अचानक सर्वात मोठा धक्का; ऐनवेळी मोठा गेम!

राज्यात 29 महापालिका निवडणुकीचा निकाल 16 जानेवारी रोजी लागला. या निवडणुकीत बहुसंख्य महापालिकांत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला. मुंबईत भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्या महायुतीचा महापौर बसणार आहे. कल्याण-डोंबिवली, ठाणे येथे या दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणूक लढवली होती. आता तिथेही महपौरपदाच्या उमेदवाराचा शोध सुरू झाला आहे. असे असतानाच आता एका महानगरपालिकेत मात्र एकनाथ शिंदे यांचे पुत्र तथा खासदार श्रीकांत शिंदे यांनी मोठी राजकीय चाल खेळली आहे. त्यांच्या या डावपेचामुळे भाजपा एकदम चितपट झाली आहे. श्रीकांत शिंदे यांच्या डावपेचामुळे आता या महापालिकेत थेट शिवसेनेचा महापौर विराजमान होणार आहे. भाजपासाठी हा चांगलाच धक्का असल्याचे बोलले जात आहे.

नेमकं काय घडलं?
मिळालेल्या माहितीनुसार उल्हासनगर महापालिकेत मोठी उलथापालथ झाली आहे. येथे एकूण 78 जागांसाठी निवडणूक झाली होती. या निवडणुकीत भाजपाला एकूण 37 जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे काहीही झाले तरी येथे भाजपाचाच महापौर बसेल, असे सांगितले जात होते. परंतु श्रीकांत शिंदे यांनी ऐनवेळी सूत्र हाती घेत मोठ्या घडामोडी घडवून आणल्या आहेत. उल्हासनगरमध्ये अपक्ष विजयी उमेदवार सविता तोरणे यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत थेट प्रवेश केला आहे. त्यामुळे शिवसेनेच्या विजयी उमेदवारांची संख्या 38 वर गेली आहे.


दुसरीकडे भाजपाचे संख्याबळ शिवसेनेपेक्षा एक उमेदवार कमी म्हणजेच 37 वर आले आले आहे.

## अजितदादांचा महापालिका निवडणुकीत पराभव का झाला?

### जरांगे पाटलांच्या दाव्यानं खळबळ,

महापालिका निवडणुकीचा निकाल लागला आहे. राज्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला, तर शिवसेना शिंदे गटाला देखील चांगलं यश मिळालं. मात्र दुसरीकडे या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा फटका बसला आहे. यावर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया समोर आली असून, त्यांनी मोठं विधान केलं आहे. 'यांनी बघायला काही ठेवलंच नाही, हे लई कलाकार आहेत. पहिली महाविकास आघाडी संपवली. आता शिंदेंचा आणि अजितदादांचा काटा काढला. अजितदादा पण असे लोक सांभाळतात त्यामुळे लोक लांब चालले आहेत. त्यांना आता कळालं पापी लोकं रक्ताने माखलेले लोक सोबत ठेवले तर असे परिणाम भोगावे लागतील. अजितदादांनी याच्यातून तरी समज घेतली पाहिजे. आपण असे नासके लोक सोबत ठेवले म्हणून आपल्यावर इतकी वाईट वेळ आली की मराठ्यांचं मतदान सुद्धा त्यांना पडलं नाही, असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, मराठ्यांचं मतदान अजित पवार यांना झालंच नाही. नाहीतर पुण्यात अजितदादांना इतकं कमी यश मिळालं नसतं. अजित पवरांना भाजप का जवळ करत नाही? यातून अजित पवारांनी काहीतरी शिकावं. दोन नासके सांभाळल्यामुळे मराठा समाज दूर गेला. यामुळेच महापालिका निवडणुकीत पराभव झाला, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे मुसलमान दलित मराठा एक झाले की सगळ्यांचा धुरळा उडतो. म्हणूनच मी दलित मुस्लिम मराठ्यांना सांगत असतो की यांना एकदा पायाखाली चेंगरा, 2029 च्या निवडणुकीत होईल असं दिसत आहे. मराठवाड्यात हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाला, अमलबजावणी झाली, मात्र प्रमाणपत्र वाटप सुरू नाही, त्यामुळे



आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किती दिवस वेड्यात काढतात ते बघू? त्यांना मराठ्याचे मत पडत आहेत. नुसता जीआर काढून मराठ्यांची फसवणूक केली तर मराठा समाज तुम्हाला पाडू शकतो. महापालिकेत मिळालेल्या यशामुळे हवेत जाऊ नका, असा इशाराही यावेळी जरांगे पाटील यांनी फडणवीस यांना दिला आहे..

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com